महाराष्ट्र शासन
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापूर रोड, धाराशिव.
Govt. of Maharashtra Office of the Dean
Govt. Ayurvedic College, Tuljapur Road, Dharashiv- 413 501
Tel No.02472-251741 Email id- gacosbd@gmail.com

जा.क्र.शाआमधा/आस्था/राप/प्राध्या/सहयोगी.प्रा/कंत्राटी/जाहिरात/ २५५/ /२०२६ दि. 25 APR 2026

**विषय:- कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरणे बाबत,**
**(Walk in Interview)**

संदर्भ :- १.शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रं.एमईएस १५०८/प्र. क्रं.९४/०८/वैसेवा-१, दिनांक ७ सप्टेंबर,२०११

२.शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,शासन निर्णय,क्रमांक : एमईएस/१०२१/प्र.क्र.१३० (भाग-१) आयु-१ दिनांक ०४ नोव्हेंबर,२०२२

उपरोक्त संदर्भित शासन निर्णयान्वये शासकीय आयुर्वेद महाविद्यालय धाराशिव येथील रिक्त पदे खालील नमुद विषयानुसार कंत्राटी तत्वावर ११ महिन्याकरिता निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता विहित अटी व शर्तीची पुर्तता करणा-या पात्र व इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती (Walk in Interview) ची दिनांक व वेळ दि.३०/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात येत आहेत

**रिक्त पदांचा तपशील**

| अ.क्र. | विषय | प्राध्यापक | सहयोगी प्राध्यापक | सहाय्यक प्राध्यापक |
|---|---|---|---|---|
| | | रिक्त पदे | रिक्त पदे | रिक्त पदे |
| १. | शारिररचना | ०० | ०१ | ०० |
| २. | क्रियाशारीर | ०० | ०१ | ०० |
| ३ | रोगनिदान | ०१ | ०० | ०० |
| ४ | रसशास्त्र | ०० | ०२ | ०० |
| ५ | स्वस्थवृत्त | ०० | ०१ | ०० |
| ६ | प्रसुतीतंत्र | ०० | ०१ | ०० |
| ७ | पंचकर्म | ०० | ०१ | ०० |
| ८ | शल्यतंत्र | ०० | ०१ | ०० |
| | एकुण रिक्त पदे | ०१ | ०८ | ०० |

एकुण ०९ पदे

डॉ.वीणा अ.पाटील
अधिष्ठाता
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

टिप- उपरोक्त नमुद रिक्त पदांवर मुलाखतीच्या/रुजु दिनांकापर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन नियमित नियुक्तीने/पदोन्नतीने किंवा बदलीने किंवा अन्य प्रशासनिक कारणास्तव उमेदवार उपलब्ध झाल्यास,त्या संबंधित विषयातील अध्यापकांचा मुलाखतीसाठी/नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| प्रत्यक्ष मुलाखतीचे स्थळ- | शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव.पिन-४१३५०१ अधिष्ठाता यांचे दालन. |
| पदनाम | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्ष पुर्ण होईपर्यंत त्यांच्या किमान ११ महिन्याचा सेवाकालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील) |
| शैक्षणिक अर्हता | ०१) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. २८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता.<br>०२)संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>०३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वत:चे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>०४)इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषेचे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| अनुभव | अ) शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हता प्राप्त करुन घेतल्या नंतरचा संबधीत आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण १० वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल त्यापैकी मान्यता प्राप्त संस्थेतुन संबधीत आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक पदाचा किमान ०५ वर्ष अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | प्रतिमाह रु.१,५०,०००/-(या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत ).तसेच सदर मानधन हे १० कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |
| पदनाम | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षापर्यंत (परंतु सदर अध्यापकांची त्याच्या वयाच्या ६५ वर्ष पुर्ण होईपर्यंत त्यांच्या किमान ११ महिन्याचा सेवाकालावधी पुर्ण होणे आवश्यक राहील) |
| शैक्षणिक अर्हता | ०५)महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं. २८) या अधिनियमाच्या परीशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब, भाग-क मध्ये नमुद केलेल्या अर्हतापैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय वैद्यक परीषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परीषदेने वेळोवेळी निर्देशीत केलेली समतुल्य अर्हता.<br>०६)संविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबधीत आयुर्वेद विषयातील पदव्युत्तर पदवी.<br>०७) ज्या उमेदवारांचे आयुर्वेद विषयातील स्वत:चे मुलभुत संशोधन निबंध अथवा पुस्तके, प्रसिध्द झालेली आहेत अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.इंग्रजी, मराठी, संस्कृत आणि हिंदी या भाषे<br>०८)चे पुरेसे ज्ञान असावे म्हणजे त्यानुसार तो त्या भाषा सहजपणे लिहण्यास, वाचण्यास व बोलण्यास समर्थ असला पाहीजे. |
| अनुभव | अ) शैक्षणिक अर्हतेमधील (१ व २) येथे दर्शविलेली अर्हतता प्राप्त करुन घेतल्या नंतरचा संबधीत आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकुण ०५ वर्षाचा अध्यापनाचा अनुभव आवश्यक असेल त्यापैकी मान्यता प्राप्त संस्थेतुन संबधीत आयुर्वेदाच्या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक या पदाचा किमान ०५ वर्ष अध्यापनाचा अनुभव असणे आवश्यक राहील. |
| मानधन | प्रतिमाह रु.१,२०,०००/-(या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत )तसेच सदर मानधन हे १० कंत्राटी सेवा या लेखाशिर्षाखाली अनुदान उपलब्धतेच्या व उपस्थितीच्या अधिन राहुन अदा करण्यात येईल. |
| इतर अटी | १.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडुन किंवा आस्थापना मंडळाकडुन वा बदलीने तसेच अन्य प्रशासनीक कारणास्तव पात्र उमेददवार उपलब्ध होई पर्यंत अथवा ११ महिने कालावधीकरीता या पैकी जे आगोदर घडेल तो कालावधी राहिल मात्र कोणत्याही परिस्थितीत ११ महिन्या नंतर खंड दिल्याशिवाय पुनः करार पध्दतीने नियुक्ती दिली जाणार नाही.<br>२.नियुक्तीसाठी वाहय शक्तीचा दबाब अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील.<br>३.सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने केलेली नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

४. नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील.
५. करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.
६. करार पध्दतीच्या उमेदवारांस विभागातील नियमित कार्यरत वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.
७. करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील.
८. करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही.तसेच करार पध्दतीवरील काम केलेला
कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.
९.करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी (०३) महीन्याची आगाऊ नोटीस
अधिष्ठातांकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास (०३) महिन्याच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्याचा/तिचा राजीनामा मंजुर करता येईल.
१०.करार पध्दतीवरील नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभाग प्रमुख व अधिष्ठाता यांचेकडून नियमीतपणे घेण्यात येईल. असा आढावा असमाधानकारक असल्यास संबधीत उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठांताकडे राहतील.
११.करार पध्दतीच्या उमेदवारांस विभागातील नियमित कार्यरत वरिष्ठ अध्यापक तसेच अधिष्ठाता यांच्या नियत्रंणाखाली आपल्या पदाचे कर्तव्य व जबाबदा-या पार पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे काम करणे बंधनकारक राहील.
१२.करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परीणाम होणार नाही याची दक्षता घेवुन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील.
१३.करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमीत नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही व न्यायालयातही करार पध्दतीची नियुक्ती कायम करण्याबाबतचा दावा करता येणार नाही. तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारांत घेता येणार नाही.
१४.नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन (७) दिवसाच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजु न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपुष्टात येईल.
१५.कार्यालयीन वेळेत खाजगी व्यवसाय करता येणार नाही. तसे आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.
१६.शासन निर्णयातील अटी व शर्तीचे पालन करणेसंबधीची तसेच कायम नियुक्तीसाठी न्यायालयात दावा दाखल न करणेसंबधीचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन/सक्षम प्राधिकरण/ कार्यालयाकडुन वेळोवेळी प्राप्त निर्देश/आदेशाचे पालन करणे संबंधितास बंधनकारक राहील.
१७.नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर फेरबदल करण्याचे किंवा रद्द करण्याचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांचेकडे राखीव आहेत.
१८.उमेदवार सध्या अन्य संस्थेत कार्यरत असल्यास संबंधित संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र तसेच उमेदवाराची निवड झाल्यास रुजु होते वेळी संबंधित संस्थेचे कार्यमुक्ती आदेश (Relieving Order)सोबत असणे आवश्यक राहील.
१९.कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.
२०.उमेदवारांनी मुलाखतीस येतांना आवश्यक ते सर्व संबंधीत मुळ कागदपत्रे व त्यांच्या सत्यप्रति सोबत आणाव्यात तसेच अनुभव प्रमाणपत्र सध्या इतर संस्थेत कार्यरत असल्यास सदर संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र आणणे अनिवार्य राहील.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

तरी इच्छुक उमेदवारांनी www.mahaayush.in व www.gacosbd.edu.in या वेबसाईट वर उपलब्ध करुन दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती व मुळ प्रमाणपत्रांसह,शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, तुळजापुर रोड,धाराशिव -४१३५०१ या ठिकाणी दि. ३० /०४ /२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मा.अधिष्ठाता यांच्या दालनामध्ये प्रत्यक्ष स्वखर्चाने उपस्थित राहावे.उशिरा उपस्थित राहणा-यांचा मुलाखतीस विचार केला जाणार नाही.

स्वाक्षरित
अधिष्ठाता,
शासकीय आयुर्वेद महाविद्यालय,धाराशिव



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner